# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

मा. कुलगुरु यांचे कार्यालय
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
आवक दिनांक 13 SEP 2025
टिपणी क्रमांक व्हीसी 4064
जावक दिनांक 13 SEP 2025

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## सोमवार, दि. १६ मार्च, २०२५ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेमध्ये झालेले निर्णय.

| विषय | निर्णय |
|---|---|
| ०१ प्रव-अ-५०/१६०३२५<br>अधिसभा दिनांक २२ मार्च, २०२५ : प्रश्न व उत्तरे : अधिसभा सदस्यांनी विचारलेले प्रश्न व कार्यालयाने तयार केलेल्या प्रश्नांच्या उत्तरांचे मसुदे मान्यतेसाठी.<br>त्याचप्रमाणे चिठ्ठ्या उचलून प्रश्नांचा क्रम ठरवणे (Draw of Lots) तसेच २०१९ चा एकरुप परिनियम क्रमांक ४ मधील तरतुदीनुसार अधिसभेत उत्तर देणाऱ्या व्यक्तीचे/सदस्याचे नाव ठरविण्याबाबत प्रस्ताव सादर. | म : ५५/१६०३२५<br>२२ मार्च, २०२५ रोजी होणाऱ्या अधिसभेसाठी, अधिसभा सदस्यांनी विचारलेल्या आणि कार्यालयाने तयार केलेल्या प्रश्नांच्या उत्तरांचे मसुदे दुरुस्त्यांसह मान्य करण्यात येत आहेत. तसेच प्रत्येक प्रश्नाचा क्रम चिठ्ठ्या टाकून ठरविण्यात येऊन, प्रत्येक प्रश्नाचे उत्तर व्यवस्थापन परिषदेच्या कोणत्या सदस्याने द्यावयाचे ते ठरविण्यात येत आहेः |
| ०२ प्रव-अ-५१/१६०३२५<br>सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या Information Techonology (Usage, Governance and Protection) Policy, 2024 (Version 1.0) चा मसुदा मान्यतेसाठी सादर. | म : ५६/१६०३२५<br>सदरील प्रस्ताव मा. व्यवस्थापन परिषदेच्या आगामी सभेत पुनःश्च सादर करण्यात यावा. |
| ०३ प्रव-अ-५२/१६०३२५<br>Turnitin Software चे नूतनीकरण करण्यास येणाऱ्या अंदाजे रक्कम रु. २२,८२,१४५/- (बावीस लाख ब्याऐंशी हजार एकशे पंचेचाळीस रुपये फक्त) सर्व करांसहित आगाऊ रक्कम अदा करणेकरिता प्रशासकीय व वित्तीय मंजुरीसाठी मा. व्यवस्थापन परिषदेस सादर. | म : ५७/१६०३२५<br>**Turnitin Software** चे नूतनीकरण **'single vendor and single quotation'** या तत्वावर एका वर्षासाठी **Campus Subscription** नूतनीकरण करण्यासाठी व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे खर्चास रक्कम रु. २२,८२,१४५/- (बावीस लाख ब्याऐंशी हजार एकशे पंचेचाळीस रुपये फक्त) सर्व करांसहित **Turnitin** या कंपनीस आगाऊ रक्कम अदा करणेकरिता प्रशासकीय व वित्तीय मंजुरी तसेच टेंडर वेवर करण्यासाठी मंजुरी देण्यात येत आहे. |
| ०४ प्रव-अ-५३/१६०३२५<br>मा. व्यवस्थापन परिषदेच्या दि. ०३.०२.२०२५ रोजीच्या सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. | म : ५८/१६०३२५<br>मा. व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक ०३.०२.२०२५ रोजी आयोजित केलेल्या सभेचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात येत आहे.<br>सदर इतिवृत्तातील सर्व विषय आणि ठराव संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यास मान्यता देण्यात येत आहे. |

(प्रा (डॉ.) ज्योती भाकरे)
मा. प्रभारी कुलसचिव
सचिव

(प्रा. (डॉ.) सुरेश गोसावी)
मा. कुलगुरु
अध्यक्ष